मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दि. 14 जुलै 2025 | पान- 1


# रस्ता अडवणाऱ्या विरोधात गुन्हे दाखल करा : उपमुख्यमंत्री अजित पवार

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा हिंजवडी दौरा : वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी रस्ते रुंद करण्याचे निर्देश

**पिंपरी | प्रतिनिधी**

आयटी हब हिंजवडीमध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दौरा केला आहे. हिंजवडीमध्ये अनेक विकास काम सुरू आहेत. वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी अनेक ठिकाणी रस्ता करण्यात येत आहे. विप्रो कंपनीच्या शेजारी रस्त्यावरून अजित पवारांनी थेट रस्ता अडवणाऱ्याला इशारा दिला आहे.

रस्ता अडवणाऱ्यावर सरकारी कामात अडथळा आणल्या प्रकरणी ३५३ कलमानुसार गुन्हे दाखल करा, त्यांना उचला. असा आदेश उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवारांनी पोलीस प्रशासनाला दिला. ज्या व्यक्तींची जागा आहे. त्या व्यक्तींना योग्य मोबदला दिला जाईल, असेही त्यांनी यावेळी अधोरेखित केलं. हिंजवडीमध्ये अनेक ठिकाणी मेट्रो आणि पीएमआरडीच ढिसाळ नियोजन पाहण्यास मिळालं.



### जो अडवा येईल, त्याला उचला, ३५३ दाखल करा

» अधिकाऱ्यांनी सरकारी रस्ता अडवणाऱ्या लोकांबाबत अजित पवारांना सांगितलं. त्यावेळी अजित पवारांनी अधिकाऱ्यांना सांगितलं, आता तुम्ही कोणाचंही ऐकू नका. चांगलं काम करा. सरकारी रस्ता अडवणाऱ्या व्यक्तींवर सरकारी कामात अडथळा आणल्या प्रकरणी 353 कलमानुसार गुन्हे दाखल करा, जे आडवं येईल त्याला उचला. त्याशिवाय हे होणार नाही. ज्याच्या मालकीची जागा जात असेल त्याला मोबदला देऊ त्याचं नुकसान करायचं आपलं काही काम नाही.

### पुणे मेट्रो लाईन ३ चे काम गतीने पूर्ण करावे

» उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बैठकीपूर्वी हिंजवडी आयटी पार्क परिसरातील पुणे मेट्रो लाईन ३ स्थानक, हिंजवडी आदी भागातील मेट्रोच्या कामाची पाहणी करून मेट्रो लाईनचे काम गतीने पूर्ण करावे अशा सूचना मेट्रो व टाटा कंपनीच्या अधिकाऱ्यांना दिल्या. हिंजवडी, माण, मारुंजी भागातील नैसर्गिक ओढे - नाल्यांवरील अतिक्रमण तसेच पाण्याचा प्रवाह रोखल्यामुळे पावसाचे पाणी साचत आहे. त्यामुळे संबंधित अतिक्रमणावर कठोर कारवाई करून प्रवाह मोकळे करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासकीय यंत्रणांना यावेळी दिले.

क्रोमा चौक येथे मेट्रो स्टेशनचा सरकता जिना चुकीच्या पद्धतीने उभारल्याचं अजित पवारांना काही जणांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर तात्काळ त्या ठिकाणी योग्य ती उपाययोजना करून वाहतूक कोंडी होणार नाही. यासाठी उपाय योजना करण्याचे पीएमआरडी आणि मेट्रो प्रशासनाला सांगितलं. त्या चौकातून दररोज लाखो आयटी अभियंते नोकरीला जातात.

आधी रस्ता मोठा होता. परंतु, मेट्रो स्टेशन उभारल्यानंतर रस्ता अगदीच अरुंद झाला आहे. यामुळे त्या रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागून वाहतूक कोंडी होते. असं नोकरी करणाऱ्या आयटी अभियंत्यांनी अजित पवारांना सांगितलं. अजित पवारांच्या दौऱ्यानंतर हिंजवडीमधील रस्ता आणि वाहतूक समस्या सुटेल अशी अपेक्षा आयटी अभियंते व्यक्त करत आहेत.

---

# देहूरोड कॅन्टोन्मेंटचा पिंपरी-चिंचवडमध्ये समावेश नाही

## देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डातील नागरी भाग पिंपरी-चिंचवड महापालिकेत विलीन करण्याचा निर्णय होऊ शकला नाही.

**चिखली| प्रतिनिधी**

खडकी व पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डाचा रहिवासी भाग पिंपरी-चिंचवड महापालिकांमध्ये विलिनीकरण राज्य शासनाने तत्वत: मान्यता दिली आहे. मात्र, देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डातील नागरी भाग पिंपरी-चिंचवड महापालिकेत विलीन करण्याचा निर्णय होऊ शकला नाही.

देहूरोडमध्ये झोपडपट्यांचे असलेले मोठे प्रमाण, रेड झोनचे मोठे क्षेत्र, संरक्षण खात्याची सर्वाधिक जागा यामुळे कॅन्टोन्मेंटचा समावेश करू नये, अशी स्पष्ट भूमिका महापालिका प्रशासनाने घेतली होती. या रेड सिग्नलमुळे देहूरोड कॅन्टोन्मेंटचा महापालिकेत समावेश झाला नसल्याचे महापालिका अधिकार्यांनी सांगितले.

पिंपरी-चिंचवड महापालिकेत हिंजवडी, माण, मारूंजी, गहुंजे, जांबे, नेरे आणि सांगवडे या सात गावांचा समावेशाचा नर्णय मागील दहा वर्षांपासून प्रलंबित आहे. असे असतानाच राज्य सरकारच्या नगर विकास विभागाने दोन वर्षांपूर्वी पिंपरी महापालिका हद्दीशेजारील देहूरोड कॅन्टोन्मेंटचा समावेश करण्यासाठी सविस्तर अभिप्राय 27 मार्च 2023 ला मागविला होता. त्यानंतर महापालिका प्रशासनाने देहूरोड कॅन्टोन्मेंटबाबत अहवाल तयार करून 7 जून 2023 ला राज्य सरकारला पाठविला होता.




### कॅन्टोन्मेंटच्या रहिवाशांच्या समावेशाला होता विरोध

» देहूरोडलगतच्या किवळे, रावेत व मामुर्डी, विकासनगर या भागाचा समावेश सन 1997 मध्ये पिंपरी-चिंचवड महापालिकेत गेला आहे. मात्र, अपेक्षित विकास साधण्यात महापालिकेला यश आलेले नाही. विकासही नाही आणि भरमसाट मालमत्ताकर यामुळे देहूरोड कॅन्टोन्मेंटमधील रहिवाशांनी महापालिकेत समावेशास विरोध केला.

# पुणे ते मुंबई महामार्गावरील मिसिंग लिंकमुळे अर्थव्यवस्थेला गती येईल : मुख्यमंत्री फडणवीस

## पुणे हे शहर महाराष्ट्राला दिशा देणारे शहर असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

**चिखली-| प्रतिनिधी**

पुणे ते मुंबई महामार्गावरील मिसिंग लिंक मुळे पुणे, मुंबई आणि एमएमआर रिजन या भागात नवीन इकॉनॉमिक कॉरीडॉर तयार करु शकणार आहोत. या भागातील अर्थव्यवस्थेला गती मिळेल असा विश्वास हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे व्यक्त केला. तसेच पुणे हे शहर महाराष्ट्राला दिशा देणारे शहर असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

केंद्रीय नागरी उड्डाण आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या एक वर्षाच्या कार्यअहवाल आणि कोरोना काळातील अनुभवावर आधारीत 'प्रथम माणूस' या पुस्तकाचे प्रकाशन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्यांनी विश्वास व्यक्त केला. यावेळी राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार मेधा कुलकर्णी यांच्यासह आमदार सिद्धार्थ शिरोळे, हेमंत रासने, सुनील कांबळे आदी नेते उपस्थित होते.

नवी मुंबईतील विमानतळ आणि पुणे ते मुंबई महामार्गावर घाट भागातील मिसींग लिंकच्या पाहणी केल्याचे नमूद करीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी मिसींग लिंकच्या कामाची विषयी माहिती देत म्हणाले की, ही मिसींग लिंक म्हणजे स्थापत्य शास्त्राचा अद्वितीय नमुना आहे. देशातील सर्वात नऊ किलोमीटर लांबीचा आणि रुंदींचा तसेच १८५ मीटर उंच केबल स्टेट ब्रीज असलेली ही मिसींग लिंक असुन, तीचे ९४ टक्के काम पुर्ण झाले असुन, नोव्हेंबर - डिसेंबर हा मार्ग सुरु करण्याचा प्रयत्न आहे. असे त्यांनी सांगितले.

या बोगद्यामुळे खंडाळा घाटातील मार्ग टाळून पुणे - मुंबईला जाता येणार आहे. तसेच यामुळे सहा किलो मीटरचे अंतर आणि अर्धा तासाचा प्रवासाचा वेळ वाचणार आहे. तसेच पुण्यातून नवी मुंबई विमानतळावर सव्वा तासात पोहचता येणार आहे. या मिसींग लिंकमुळे मुंबई, पुणे आणि एमएमआरडीए या भागात आपण नवीन इकोनॉमिक कारीडॉर तयार करू शकणार आहोत, यामुळे या भागातील अर्थ व्यवस्थेला गती मिळेल" असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

एक वर्षात काय काम केलं त्याचा अहवाल सादर करण्याची भाजप पक्षाची परंपरा आहे. जनसंपर्क कार्यालया २४ तास नागरिकांच्या समस्या समजून घेता येणार आहेत. लोकांच्या अपेक्षा आहेत, त्यांचे प्रश्न सोडवले जातील. यात अनेक सुविधा देणार आहेत. अनेक योजनाबाबत माहिती, मदत केंद्र असेल, वैद्यकीय कक्ष सुरू असेल. सहा मतदारसंघात जनता दरबार पुण्यात सुरू आहे. असे मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले.



### ... मोहोळ यांचे केले कौतुक

» मोहोळ स्वतः पैलवान आहेत. सगळ्या क्षमतेने पैलवान लढत असतो, मोहोळ लढत आहेत, कोविड काळात केलेले काम अप्रतिम आहे. कोविड काळात अनेक नेते घरी बसून होते, काम करत नव्हते, त्यावेळी मोहोळ काम करत होते. चांगल्या काळात कोणीही नेतृत्व करते पण संकटात खर नेतृत्व समजते. त्यामुळे कोविड काळात त्यांचे नेतृत्व तयार झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्या सोबत काम करणे म्हणजे शिस्त असते, पद उपभोगत येत नाही तर जबाबदारी असते. असे त्यांनी सांगितले. अमित शहा यांनी माझ्याकडे मोहोळ याचे कौतुक केले, म्हणले मोहोळ चांगले काम करत आहेत, मोदी शहा कोणाचे कौतुक करत नाहीत,त् यामुळे तुमची ट्रेन पटरीवर चालली आहे. असेही त्यांनी सांगितले.

### स्थापत्यशैलीची दखल जगाने घेतली...

» युनोक्सोने महाराष्ट्रातील अकरा आणि कर्नाटकातील एक किल्ला जागतिक वारसा म्हणून जाहीर केल्याचा संदर्भ देत फडणवीस म्हणाले, "स्थापत्यशैलीमुळे सदर किल्ले हे जागतिक वारसा झाले आहे. त्यामुळे शिवरायांचा इतिहास, मराठा साम्राज्याचा इतिहास हा जागतिक झाला आहे. युनोक्सोच्या माध्यमातून हा इतिहास आता जगापुढे येईल. त्यामुळे पर्यटक, अभ्यासकांच्या दृष्टीने हे किल्ले आकर्षणाचे केंद्र झाले आहे " असे फडणवीस यांनी नमूद केले.

# महापालिकेच्या महत्वाच्या 30 प्रकल्पांना गती देण्यासाठी 'वॉर रुम'

## विविध विकास कामांचे प्रकल्प प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी महापालिका आयुक्तांच्या आदेशाने 'वॉर रुम' स्थापना करण्यात आली

**चिखली-| प्रतिनिधी**

पुणे महापालिका हद्दीत झपाट्याने लोकसंख्या वाढत आहे. पुणेकरांसाठी महापालिकेने विविध प्रकल्पांची कामे सुरु केली आहेत. मात्र अनेक प्रकल्प निधी अभावी अथका काही अडचणींमुळे रखडले आहेत. तर काही प्रकल्पांची कामे संथ गतीने सुरु आहेत. त्यामुळेच महत्वाच्या ३० विविध विकास कामांचे प्रकल्प प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी महापालिका आयुक्तांच्या आदेशाने 'वॉर रुम' स्थापना करण्यात आली आहे.

शहरात पुणे महामेट्रो, पीएमआरडीए, तसेच इतर संस्थांची विविध विकास कामे सुरु आहेत. त्यामुळे पुणेकरांना त्रास सहन करावा लागत आहे. महापालिकेचे सुरु असलेल्या शहरातील प्रमुख विकासकामांना गती देण्यासाठी, त्यांच्या कामावर देखरेख ठेवण्यासाठी महापालिकेने आता 'वॉर रुम'ची स्थापना केली आहे. या वॉरवर स्वत: महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांचे लक्ष असणार आहे. प्राधान्य क्रम ठरवून दिलेली कामे पूर्ण केली जाणार असून या कामाचा दर १५ दिवसांनी आढावा घेतला जाणार आहे. यासाठी विशेष उपायुक्तांची या कामांसाठी नियुक्ती केली असून, संबंधित विभागांच्या नियमित बैठका घेऊन त्याचा अहवाल सादर करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली आहे.

जायका प्रकल्प, नदीकाठ विकास, समान पाणीपुरवठा योजना, कात्रज - कोंढवा व शिवणे - खराडी रस्ते विस्तार तसेच विविध उड्डाणपूल यांसारख्या सुमारे ३० प्रकल्पांचा यात समावेश करण्यात आला आहे. या प्रकल्पांसाठी केंद्र व राज्य शासनासह 'सीएसआर'निधीच्या माध्यमातून आर्थिक साहाय्य मिळाले आहे. मात्र, बहुतांश कामांची मुदत संपूनही ती रखडली असून, मुदतवाढ देऊनही प्रगती अत्यल्प आहे. नवलकिशोर राम यांनी आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर सर्व खात्यांची बैठक घेतली होती.




### महत्त्वाच्या प्रकल्पांवर लक्ष केंद्रित करणार

» प्रत्येक विभागाच्या प्रकल्पांची स्थिती काय आहे याची माहिती घेतली. हे प्रकल्प वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहेच, पण त्यांचा दर्जाही चांगला असणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे आयुक्तांनी महापालिकेच्या प्रमुख ३० ते ३२ महत्त्वाचे प्रकल्पांवर लक्ष केंद्रित करणार असल्याचे स्पष्ट केले होते. रखडलेल्या प्रकल्पांमुळे शहरात वाहतूक कोंडीने पुणेकरांचा श्वास कोंडला आहे. तसेच नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत असून, महापालिकेच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी सर्व विभागप्रमुखांकडून रखडलेले प्रकल्प आणि अडचणींचा सविस्तर आढावा घेतला

# गौण खनिज उत्खनन पडले महागात

## चिखली येथील साई एस्सेन डेव्हलपर्सला २० कोटी १३ लाखांच्या दंडाची नोटीस; दंड तत्काळ भरण्याचेही आदेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील चिखली येथील जमीन गट नं. ७२/१ आणि गट नं. ९४ मधील प्लॉट नंबर १०, ११ मधून विकसक मे. साई एस्सेन डेव्हलपर्सचे भागीदार सतीश अगरवाल यांनी बांधलेल्या 'ऐश्वर्यम हमारा अभिमान' या रहिवासी व कमर्शियल या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात अनधिकृत गौण खनिज उत्खनन करून वाहतूक केली आहे. त्यामुळे अवैध गौणखनिज उत्खनन प्रकरणी २० कोटी १३ लाख १३ हजार रुपये दंडाची नोटीस बजावण्यात आली आहे. हा दंड तत्काळ भरण्याचे आदेश अपर तहसीलदार जयराज देशमुख यांनी दिले आहेत.



चिखली मध्ये मे. साई एस्सेन डेव्हलपर्सतर्फे सतीश भीमसेन अगरवाल यांनी ऐश्वर्यम हमारा अभिमान या रहिवासी आणि कमर्शियल प्रकल्पाचे काम हाती घेतले आहे. या प्रकल्पासाठी अनधिकृत गौण खनिज उत्खनन होत असल्याची तक्रार जिल्हाधिकारी कार्यालय पुणे येथील खनिकर्म शाखेकडे आली होती.

त्यानुसार चिखली तलाठी यांच्याकडून सदर गट नंबरमधील प्लॉटचा पंचनामा करण्याचे आदेश देण्यात आला. चिखलीतील गट नं. ९४ मधील प्लॉट नंबर १०, ११ मधील पंचनामा अहवाल सादर करण्यात आला. त्या अहवालात २९६४५ इतका ब्रास, तर जमीन गट नं. ७२/१ मध्ये १८४५० ब्रास इतके गौण खनिज उत्खनन केल्याचे नमूद केले होते. सदरील तक्रारीवर नैसर्गिक न्यायाच्या दृष्टिकोनातून संबंधित विकसक यांना रोजी नोटीस देत म्हणणे सादर करण्यास संधी देण्यात आली. त्यांनी लेखी म्हणणे सादर केले. या सुनावणीत गौण खनिज उत्खनन ईटीएस मोजणीच्या सूचना देण्यात आल्या. सदरच्या जमिनीमध्ये अवैध उत्खनन करून खासगी विकसकांकडून रॉयल्टी बुडवून मुरूमचोरी असल्याचे तक्रारीत म्हटले होते.

या जमीन गट नं. ९४ मधील प्लॉट नंबर १०, ११ मधून ईटीएस मोजणीनुसार १७७६९.१८७ इतके ब्रास उत्खनन झालेले असून, ७०८.५५२ ब्रासचा साठा उपलब्ध आहे. त्यानुसार ईटीएस मोजणीनुसार झालेल्या उत्खननातून उपलब्ध साठा वजा केला, तर १७०६०. ६३५ इतके ब्रास अनधिकृत गौण खनिज उत्खनन झालेले आहे. तसेच, अन्य गट नंबरमध्ये ईटीएस मोजणी अहवालाचे अवलोकनात चिखलीतील एकूण २०९३२.००२ ब्रास इतके गौणखनिज उत्खनन झालेले आहे. या जागेवर साठा उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. परंतू, संबंधित विकसकानी ८५० ब्रासचा तात्पुरता गौणखनिज उत्खनन व वाहतुकीचा परवाना घेतलेला आहे. त्या ईटीएस मोजणीनूसार उत्खनन झालेल्यामधून शासकीय परवाना वजा केल्यास २००८२.००२ ब्रास इतके अनधिकृत उत्खनन झाल्याचे निदर्शनास येत आहे.

त्यामुळे जमीन गट नं. ७२/१ मधून तलाठी पंचनाम्यानुसार १८४५० ब्रास गौणखनिज उत्खनन झाल्याचे नमूद होते. तर ईटीएस मोजणीनुसार २०९३२.००२ ब्रास इतके गौणखनिज उत्खनन झालेले असून जागेवर साठा नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. आमच्या कार्यालयाकडून ३०० ब्रास व उपविभागीय कार्यालयाकडून ५५० ब्रास अशी ८५० ब्रास गौण खनिज उत्खनन व वाहतुकीची परवानगी घेतलेली आहे. त्यामुळे २००८२.००२ ब्रास इतके अनधिकृत गौण खनिज उत्खनन व वाहतूक केलेले आहे.

> **पिंपरी-चिंचवड शहरात अवैध गौण खनिज उत्खनन करणाऱ्यांवर सतत कारवाई सुरू असते. पाचशे ब्रासपेक्षा अधिक अथवा अवैध उत्खनन कोण करत असल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येते. त्यानूसार चिखली परिसरात अवैध माती, मुरूम गौणखनिजाचे उत्खनन करण्यात आले होते. याबाबत मे. साई एस्सेन डेव्हलपर्सने गौण खनिज उत्खनन केल्याची तक्रार आली होती. त्या जागेचा पंचनामा, ईटीएस मोजणी केलेली आहे. संबंधित सुनावणी घेऊन दंडात्मक कारवाई केलेली आहे. त्यानुसार अवैध गौणखनिज उत्खनन प्रकरणी २० कोटी १३ लाख १३ हजार रुपये दंड केला आहे.**
>
> **- जयराज देशमुख, अपर तहसीलदार, पिंपरी-चिंचवड**

> **चिखली येथील आमच्या जागेत आम्ही गौण खनिज उत्खनन करताना परवानगी घेतली होती. त्या गौण खनिज उत्खननाचे मोजमाप चुकीच्या पध्दतीने झालेले आहे. आमच्यावर केलेली दंडात्मक कारवाईदेखील चुकीची आहे. या दंडात्मक कारवाई आम्ही वरिष्ठांकडे अपील करणार आहे.**
>
> **- सतीश अगरवाल, मे. साई एस्सेन डेव्हलपर्स**

# महापालिका दीड वर्षात हटविणार कचऱ्याचे डोंगर

## बायोमायनिंग खर्च वाढला, १०५ कोटींचा खर्च १४२ कोटींवर पोहोचला, कचऱ्यावर शास्त्रीय पद्धतीने प्रक्रिया


**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराचा संपुर्ण कचरा हा मोशी कचरा डेपोत टाकला जातो. गेल्या वीस पंचवीस वर्षात कचऱ्याचे डोंगर तयार झाले आहेत. २३ लाख क्युबिक कचरा तयार झाला होता. त्या कचऱ्यावर शास्त्रीय पध्दतीने प्रक्रिया करत बायोमायनिंग करण्याचे काम सुरु होते. दुस-या टप्प्यात कचऱ्याच्या बायोमायनिंगचे काम पुर्ण सुरु आहे. या टप्प्यातील १०५ कोटीचा खर्च करण्यात येणार होता. आता तो १४२ कोटी ४५ लाखावर पोहोचला आहे. त्यामुळे हे काम दीड वर्षात पुर्ण करुन कचऱ्याचे डोंगर हटवण्यावर खर्च वाढला आहे, असा दावा पर्यावरण अधिकाऱ्याकडून केला जात आहे.

पिंपरी चिंचवड शहरात दैनंदिन निर्माण होणारा कचरा पुर्वीपासुन मोशी येथील कचरा डेपोमध्ये प्रक्रिया करण्याकरिता पाठविण्यात येतो. बायोमायनिंग प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर मोशी कचरा डेपोमध्ये २५ एकर जमीन मोकळी होणार आहे.

महापालिका कार्यक्षेत्रात मोशी कचरा डेपोत सॅनिटरी लँडफिल १, २ व कँपिंग केलेल्या एकुण २५ एकर जागेत २३ लाख चौरस मीटर (८ लाख + १५ लाख) इतका जुना डंपींग केलेला कचरा साठवून ठेवला आहे. महानगरपालिकेने जुन्या डंपिंग केलेल्या कचऱ्याचे बायोमायनिंग करण्याचे काम सुरु केले आहे.

कचऱ्याच्या डोंगराची बायोमायनिंगद्वारे विल्हेवाट लावली जात आहे. त्या कामाच्या दुसऱ्या टप्प्यातील खर्च १०५ कोटी रूपये खर्चाचे काम सुरू आहे. तो खर्च आता १४२ कोटी 45 लाखांवर पोहोचला आहे.



कचऱ्याचे डोंगर हटविण्यासाठी पहिल्या टप्प्यात ४२ कोटी रूपयांची निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. त्यात ८ लाख क्युबिक कचरा हटविण्यात आला आहे. आता दुसऱ्या टप्प्यातील १०५ कोटी रूपये खर्चाचे काम सुरू आहे. त्यात १५ लाख क्युबिक कचरा हटविण्यात येत आहे. ते काम सेव्ह इन्व्हायरोमेट मॅनेजमेंट अॅण्ड इंजिनिअरींग प्रा. लि. आणि बी. व्ही.जी. इंडिया प्रा.लि. या दोन ठेकेदार कंपनीला दिले आहे.

### बायोमायनिक प्रक्रियेद्वारे कचऱ्याचे रूपांतर

» **बायोमायनिक प्रक्रिया म्हणजे सेंद्रिय कचऱ्याचे सूक्ष्मजीवांच्या सहाय्याने विघटन करून त्यामधून ऊर्जेचे किंवा खताचे उत्पादन करण्याची शाश्वत पद्धत होय. घरगुती स्वयंपाकातील भाजीपाल्याचा कचरा, अन्नउत्पन्न, फळांचे साली, झाडांची पाने इ. जैविक घटक यामध्ये वापरले जातात.**

> **३० वर्षातील साठलेल्या कचऱ्याचे शास्रोक्त पद्धतीने विघटन होणार आहे. बायोमायनिंगचे दुसऱ्या टप्प्याचे काम पुर्ण झाल्यास २५ एकर जागा घन कचरा व्यवस्थापनाच्या इतर प्रकल्पांकरीता उपलब्ध होणार आहे. कचऱ्याचे आरडीएफ आणि जैव माती सारख्या मौल्यवान स्त्रोतांमध्ये रूपांतर करून महापालिका टिकाऊ पद्धतींना चालना देत आहे. ज्यामुळे पर्यावरणाला फायदा होत आहे.**
>
> **- संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता, पर्यावरण विभाग, महापालिका**

# बाजार समिती संचालक मंडळाची ईडीकडून चौकशी करा

## कोट्यवधींचा घोटाळा झाल्याचा शरद पवार गटाचा आरोप, न्यायालयात जाण्याचा इशारा

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मंडळ बरखास्त करून सर्व संचालकांची ईडी तसेच आयकर विभागामार्फत स्वतंत्र चौकशी करण्यात यावी. तसेच दोषीवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष - शरदचंद्र पवार गटाने बुधवारी (दि. ९) केली.

पुणे पत्रकार भवन येथे बुधवारी (दि.९) पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या प्रकरणातील दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावे. अन्यथा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष - शरदचंद्र पवार गट न्यायालयात जाणार असल्याचा इशारा या पक्षाचे प्रदेश प्रवक्ते विकास लवांडे यांनी दिला.

तालुक्यातील शेतकऱ्यांनी शरद पवार यांची भेट घेऊन सर्व माहिती दिली आहे. त्यावर त्यांनी या प्रकरणात लक्ष घालत असल्याचे सांगून अधिवेशनानंतर पणनमंत्री जयकुमार रावल, पालकमंत्री अजित पवार आणि तक्रारदार संघटना आणि अधिकारी यांची एकत्रित बैठक घेण्याचा प्रयत्न करू, असे आश्वासन दिल्याचे लवांडे यांनी सांगितले.



### अजित पवार यांनी येऊन पाहणी करावी...

» पालकमंत्री अजित पवार यांना सकाळी उठून प्रत्येक काम पाहण्याची आणि गुणवत्ता तपासण्याची सवय आहे. चांगली सवय आहे. त्यांनी पुणे बाजार समितीत पहाटे येऊन सर्व बाजाराची पाहणी करावी. त्यावेळी आम्हालाही बोलविण्यात यावे. त्यानंतर दोषीवर सक्त कारवाई करावी, अशी मागणी देखील लवांडे यांनी यावेळी केली. वीस वर्षापूर्वी बाजार समितीतील घोटाळ्याप्रकरणी मुलानी समितीने चौकशी केली होती. त्याचा अहवाल सादर झाल्यानंतर त्यावर अद्याप ठोस कारवाई झालेली नाही. उलट त्यातील पाच संचालक आत्ताच्या संचालक मंडळात आहेत. त्यामुळे नव्याने होणारी चौकशी ही निपक्ष व्हावी, अशी मागणीदेखील लवांडे यांनी केली.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष - शरदचंद्र पवार गटाचे संघटक विक्रांत पाटील उपस्थित होते. लवांडे म्हणाले की, संचालक आल्यापासून बाजार समितीत टेंडर, सेस घोटाळा, मोशी बाजारातील दिलेले गाळे, सुरक्षा रक्षकांमध्ये झालेलाघोटाळा, डमी व्यापाऱ्यांच्या माध्यमातून होत असलेली शेतकऱ्यांची पिळवणूक, बेकायदा पद्धतीने पार्किंग वाटप, टपऱ्या उभारणे, आडतदारांचे दप्तर तपासणी, जी ५५ जागेवरील अनधिकृत वसुली, फुलबाजार घोटाळा यासह विविध गैरकारभार मोठ्या प्रमाणात वाढले आहेत.

### चौकशी होणारे महत्वाचे मुद्दे

» डमी अडत्यांकडून दुबार विक्री आणि सेस चुकवेगिरी
» ११ वर्षांच्या नोटरी कराराने दिलेला पेट्रोल पंप
» बाजारातील अनधिकृत बांधकामे
» जी ५६ जागांवरील अतिक्रमण आणि बेकायदेशीर वसुली
» बनावट पावती पुस्तकांचा वापर करून पार्किंग शुल्कवसुली
» विविध टेंडर सुरक्षारक्षक टेंडर आणि त्यातील गैरव्यवहार, शेतमाल आवक नोंदीत गैरव्यवहार
» चायनीज भाज्यांची आवक आणि सेस चुकवेगिरी

### चौकशी समितीच्या अध्यक्षावर आक्षेप

» पुणे जिल्हा ग्रामीणचे उपनिबंधक प्रकाश जगताप यांचे संचालक मंडळाशी हितसंबध आहेत. त्यांनीच संचालक मंडळाला अभय दिले आहेत. या आधी संचालकांनी त्यांच्या चौकशीचे आदेश दिले होते. परंतु त्यांनी कोणतीही चौकशी केली नसल्याचा आरोप करून लवांडे यांनी चौकशी समितीचे समितीचे अध्यक्ष बदलण्याची मागणी केली

### शरद पवार मंत्र्यांना भेटणार

» बाजार समितीतील गैरकारभार आणि घोटाळ्याबद्दल मी आणि तालुक्यातील शेतकऱ्यांनी शरद पवार यांची भेट घेऊन सर्व माहिती दिली आहे. त्यावर त्यांनी या प्रकरणात लक्ष घालत असल्याचे सांगून अधिवेशनानंतर पणनमंत्री जयकुमार रावल, पालकमंत्री अजित पवार आणि तक्रारदार संघटना आणि अधिकारी यांची एकत्रित बैठक घेण्याचा प्रयत्न करू, असे आश्वासन दिल्याचे लवांडे यांनी सांगितले.

# एकलहरे येथे रस्त्याच्या बाजूची झाडे काढली

## पुणे-नाशिक रस्त्याच्या उजव्या बाजूला पुलाच्या बाजूने झाडे झुडपे वाढल्याने ग्रामस्थ आणि शालेय विद्यार्थ्यामध्ये भीतीचे वातावरण तयार झाले होते

**पुणे | प्रतिनिधी**

एकलहरे (ता.आंबेगाव) येथे पुणे-नाशिक रस्त्याच्या उजव्या बाजूला पुलाच्या बाजूने झाडे झुडपे वाढल्याने ग्रामस्थ आणि शालेय विद्यार्थ्यामध्ये भीतीचे वातावरण तयार झाले होते.तसेच बिबट्याच्या दहशतीमुळे भीतीचे वातावरण तयार होते. रस्त्याच्या कडेला असलेली झाडेझुडपे जेसीबीच्या सहाय्याने काढण्यात आली आहे.

एकलहरे येथे पुणे-नाशिक रस्त्याच्या उजव्या बाजूला पुलाच्या बाजूने मोठ्या प्रमाणात झाडे झुडपे वाढली होती. या रस्त्याने एकलहरे-शिंदेवाडी परिसरातील शाळकरी विद्यार्थ्यांना, महिला,जेष्ठ नागरिक यांना पायी प्रवास करताना रस्त्यावरील जाणाऱ्या वाहनांच्या भीतीने जीवमुठीत धरून प्रवास करावा लागत होता.

एकलहरे परिसरात रस्त्याच्या बाजूला व्यावसायिकांनी किंवा अज्ञात गाडी चालकांनी कचरा टाकून घाण करू नये.अन्यथा या ठिकाणी कचरा टाकताना आढळल्यास सदर व्यक्तीकडून दंड वसूल केला जाईल. असा इशारा ग्रामपंचायत सदस्य प्रदीप शिंदे यांनी दिला.

यामुळे एकलहरे सुलतानपूर ग्रामपंचायतीने पुढाकार घेऊन येथे वाढलेली झाडेझुडपे जेसीबी उद्योजक शेखर कानडे यांच्या मदतीने काढून टाकली आहे. अशी माहिती एकलहरे गावच्या ग्रामसेविका शामल थोरात आणि माजी उपसरपंच दीपक डोके यांनी दिली.



### कचरा टाकणाऱ्याला दंड...

» एकलहरे परिसरात रस्त्याच्या बाजूला व्यावसायिकांनी किंवा अज्ञात गाडी चालकांनी कचरा टाकून घाण करू नये.अन्यथा या ठिकाणी कचरा टाकताना आढळल्यास सदर व्यक्तीकडून दंड वसूल केला जाईल. असा इशारा ग्रामपंचायत सदस्य प्रदीप शिंदे यांनी दिला. परिसरामध्ये कचरा टाकून येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात आणू नये.असे आवाहन एकलहरे ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आले आहे.

एकलहरे रस्त्याच्या कडेला वाढलेली झाडेझुडपे,ग्रामपंचायत क्लार्क राहुल डोके, माजी उपसरपंच दीपक डोके व उद्योजक शेखर कानडे यांनी स्वतः उभे राहून काढून घेतली आहेत. पुढील काळात रस्त्याच्या डाव्या बाजूची सुद्धा स्वच्छता ग्रामपंचायतीच्या माध्यमातून लवकरच केली जाणार असल्याची माहिती सरपंच राणी खैरे, उपसरपंच प्रीती डोके यांनी दिली आहे.